महाराष्ट्र राज्याच्या साप्ताहिक सोडती, पुष्कराज सोडत व आकषर्क पुष्कराज सोडत तिकीटाची विक्री लॉटरी विक्रेत्यामार्फत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक: मरालॉ-२००४/प्र.क्र.१०६/लॉटरी-३
नवीन प्रशासन भवन,८ वा मजला मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-२१ ऑगस्ट ,२००४

पहावे:- १) शासन निर्णय क्र.मरालॉ-२००३/प्र.क्र.९३(१)/०४/लॉटरी-२ दिनांक २९.४.२००४
२) शासन निर्णय क्र.मरालॉ-२००३/प्र.क्र.९३/(२) /०४/लॉटरी-२ दिनांक २९.४.२००४
३) शासन निर्णय क्र.मरालॉ-२००३/प्र.क्र.९३/(३) /०४/लॉटरी-२ दिनांक २९.४.२००४

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक साप्ताहिक, मासिक सोडतीच्या तिकीट विक्रीसाठी १)पुणे २)कोल्हापूर ३)सांगली ४)सातारा ५) नाशिक ६) जळगांव ७) धुळे ८) नागपूर ९) अहमदनगर व १०) अकोला या जिल्हयांसाठी निविदेच्या माध्यमातून जिल्हानिहाय स्टॉकीस्ट नियुक्त करण्यात आलेले आहेत. तथापि,साप्ताहिक लॉटरी योजनांच्या तिकीटांपैकी ५०% तिकीटे मुंबई जिल्हयासाठी वितरित केली जातात. मुंबई जिल्हयासाठी सात स्टॉकीस्ट नियुक्त करावयाचे होते. तथापि, निविदेला दोन वेळा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे स्टॉकीस्ट नियुक्ती करणे शक्य झालेले नाही. सद्य:स्थितीत वर नमूद केलेल्या उपरोक्त दहा जिल्हयांसाठी स्टॉकीस्ट नियुक्त केलेले आहेत. त्यांना १९% डिस्काउंट रेटने तिकीट विक्री करण्यात येते व उर्वरित अभिकर्ता /विक्रेता यांच्यासाठी १७%डिस्काऊंट रेट ठेवण्यात आलेला आहे. तथापि, एकूण वस्तुस्थितीचा विचार केल्यानंतर स्टॉकीस्ट नियुक्तीसाठी स्थापन केलेल्या तांत्रिक मूल्यमापन समितीच्या दिनांक ९.८.०४ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये समितीने असा निर्णय घेतला की, महाराष्ट्र राज्य लॉटरी (अधिनियम) नियम १९८५ नुसार ज्या अभिकर्त्यांच्या एजन्सिज कार्यान्वित आहेत त्या रद्द करण्यात याव्यात व स्टॉकीस्ट नियुक्त करण्यासाठी यापुढे निविदा न काढता सरसकट सर्व विक्रेत्यांसाठी १९% सूट देऊन शिवडी कार्यालयामार्फत रोखीने तिकीट विक्री सुरु करण्यात यावी. ही कार्यपध्दती प्रथमत: प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यासाठी चालू ठेवावी व त्यानंतर तिकीट विक्रीचा आढावा घेऊन योजना पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळाने दिनांक १३.८.०४ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये तांत्रिक मुल्यमापन समितीच्या निर्णयास मान्यता दिली.

शासन निर्णय :

महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळाच्या दिनांक १३.८.२००४ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य लॉटरी (अधिनियम) १९८५ नुसार लॉटरी अभिकर्त्यांना

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक साप्ताहिक/ मासिक लॉटरी तिकीटांची विक्री करण्यासाठी देण्यात आलेल्या एजन्सी या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या पारंपारिक साप्ताहिक लॉटरी तिकीटांच्या विक्रीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भामध्ये नमूद केलेल्या शासन निर्णय १) शासन निर्णय क्र.मरालॉ-१००३/प्र.क्र.९३ (१)/०४/लॉटरी-२ ,२) शासन निर्णय क्र.मरालॉ-१००३/प्र.क्र.९३/(२) /०४/लॉटरी-२ , ३) शासन निर्णय क्र.मरालॉ-१००३/प्र.क्र.९३/(३) /०४/लॉटरी-२ दिनांक २९.४.२००४ अन्वये अनुक्रमे साप्ताहिक सोडती , पुष्कराज सोडत व आकर्षक पुष्कराज या साप्ताहिक /पुष्कराज/आकर्षक पुष्कराज सोडतीच्या तिकीटांच्या घाऊक दरात शासन नियुक्त स्टॉकीस्टना १९% सूट देण्यात आली आहे व शासन मान्य अभिकर्त्यांना १७% सूट देण्यात आली आहे. हे शासन नियुक्त अभिकर्ते महाराष्ट्र राज्य लॉटरी (अधिनियम) नियम १९८५ नुसार नियुक्त करण्यात आले होते. तथापि, प्रस्तुत आदेशान्वये शासन नियुक्त अभिकर्त्यांच्या एजन्सी रद्द करण्यात येत असून, त्याऐवजी सरसकट सर्व लॉटरी विक्रेत्यांना सर्व सोडतीच्या तिकीटांच्या घाऊक दरात खाली अटींच्या अधिन राहून १९% सूट देण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

१) लॉटरी विक्रेत्यांना प्रत्येक सोडतीची किमान ५०० तिकीटे घेणे बंधनकारक राहिल.

करीता (२) सर्व लॉटरी विक्रेत्यांना सोडती ... विक्रीस काढलेल्या प्रत्येक सोडतीच्या बक्षिस योजनेत दर्शविलेला अभिकर्ता बोनस अनुज्ञेय राहील तथापी स्टॉकीस्ट बोनस अनुज्ञेय राहणार नाही .

३)सर्व सोडतींच्या रु.५०००/- व त्या खालील बक्षिसांच्या रकमेच्या प्रतिपूर्तीच्यावेळी लॉटरी विक्रेत्यांना २% सेवा आकार देण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kavita Gupta

(श्रीमती कविता गुप्ता)
सचिव, (लेखा व कोषागारे)
वित्त विभाग.

प्रति,

१] राज्य लॉटरी मंडळाचे सर्व सदस्य,
२] महालेखापाल, महाराष्ट्र [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर,
३] महालेखापाल, महाराष्ट्र [लेखापरिक्षा], मुंबई/नागपूर
४] अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई [५] कक्ष अधिकारी, वित्त विभाग/प्रशा-४,
६] निवासी लेखा अधिकारी, मुंबई [७] संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
८] सर्व जिल्हाधिकारी [९] सर्व कोषागार अधिकारी,
१०] माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
११] उप संचालक, अल्पबचत, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
१२] उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
१३] सर्व सहाय्यक संचालक, अल्पबचत [१४] सर्व जिल्हा माहिती अधिकारी,
१५] व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
१६] वरिष्ठ सहायक संचालक [अल्पबचत व राज्य लॉटरी प्रसिध्दी शाखा].